# महावितरण विद्युत वार्ता

■ वर्ष : १८ ■ अंक : २० ■ जानेवारी २०२५ ■ पाने : ८


# नवे वर्ष, परिवर्तनाचा संकल्प

## हितगुज



**श्री. लोकेश चंद्र**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

**मा. मुख्यमंत्री** श्री.देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच सांगितले की, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० हा राज्य शासनाचा फ्लॅगशीप कार्यक्रम आहे व कोणत्याही परिस्थितीत त्याची अंमलबजावणी वेळेत पूर्ण करावी. मा. मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार महावितरण या परिवर्तनकारी योजनेच्या अंमलबजावणीसाठी अथक परिश्रम करत असून यापुढेही करेल, याची मी ग्वाही देतो.

शेतकऱ्यांना सध्या दिवसा आणि रात्री असा दोन पाळ्यांमध्ये सिंचनासाठी वीज पुरवठा केला जातो. ही गेल्या अनेक दशकांची स्थिती आहे. कृषी पंपांसाठी केवळ दिवसा आणि भरवशाचा वीज पुरवठा करावा, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. त्यासाठी मा. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना सुरू केली. विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती करून त्यावर कृषी फीडर्स चालवायचे व शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज पुरवठा करायचा अशी ही योजना आहे. एप्रिल २०२३ मध्ये मा. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सुधारित योजना सुरू झाली व मार्च २०२४ मध्ये ९ हजार मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जानिर्मिती क्षमतेचे प्रकल्प उभारण्यासाठी विकसकांना लेटर ऑफ अॅवॉर्ड देण्यात आले.

सौर ऊर्जानिर्मितीसाठी प्रती मेगावॅट चार एकर जमिनीची आवश्यकता असते. त्यानुसार हजारो एकर सार्वजनिक जमीन उपलब्ध करणे, सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प उभारणीसाठीचे टेंडर काढणे, वीज खरेदीचे करार करणे आणि लेटर ऑफ अॅवॉर्ड देणे अशी सर्व कामे केवळ अकरा महिन्यांच्या विक्रमी कालावधीत गतीने करण्यात आली. राज्याचा ऊर्जा विभाग, महसूल विभाग आणि महावितरण यांनी समन्वयाने ही कामगिरी केली. त्यानंतर सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प उभारणीचे काम गतीने सुरू झाले आहे. लेटर ऑफ अॅवॉर्ड दिल्यानंतर केवळ सहा महिन्यात मा. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पहिल्या पाच सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पांचे लोकार्पण करण्यात आले. त्यानंतर नियमितपणे नवनवे प्रकल्प कार्यान्वित होत आहेत. नुकतेच मा. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते दोन प्रकल्पांचे लोकार्पण करण्यात आले. या प्रकल्पांमधून सौर ऊर्जानिर्मिती सुरू झाली असून संबंधित शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा होऊ लागला आहे. आतापर्यंत १२२ मेगावॅट क्षमतेचे २७ प्रकल्प कार्यान्वित झाले असून एक लाखापेक्षा जास्त शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठ्याचा लाभ होत आहे.

**गेमचेंजर प्रकल्प**

मा.मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस हे सातत्याने शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्याच्या या योजनेबाबत आग्रही राहिले आहेत. त्यांची दूरदृष्टी, दृढ निश्चय आणि भक्कम पाठबळामुळेच योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र राज्याने आघाडी घेतली आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० हा ऊर्जा क्षेत्रातील गेमचेंजर प्रकल्प आहे. त्याचे अनेक लाभ होणार आहेत. शेतकऱ्यांना दिवसा आणि भरवशाचा वीज पुरवठा झाल्यामुळे त्यांची अनेक दशकांची मागणी पूर्ण होणार आहे. रात्री सिंचन करताना साप, विंचू इत्यादींचे भय असते. रात्री शेतात काम करताना अनेक प्रकारे गैरसोय होते. त्यामुळे शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी या योजनेचे महत्त्व अधिक आहे. सध्या साडेआठ रुपये प्रति युनिट दराने उपलब्ध होणारी वीज कृषी पंपांना केवळ दीड रुपये प्रती युनिट दराने दिली जाते. मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेमुळे राज्य सरकार हे शेतकऱ्यांचे बिल भरते. पण शेतकऱ्यांना स्वस्तात वीज देण्यासाठी राज्य सरकारवर अनुदानाचा आणि उद्योगांवर क्रॉस सबसिडीचा बोजा पडतो. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मध्ये साधारणपणे तीन रुपये प्रती युनिट अशा किफायतशीर दरात वीज उपलब्ध होत असल्याने राज्य सरकारवरील अनुदानाचा आणि उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा कमी होणार आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे जी आर्थिक बचत होणार आहे त्यामुळे काही वर्षात मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेची भरपाई होणार आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांसाठीच्या वीज खरेदी खर्चात बचत झाल्यामुळे उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा कमी होऊन त्यांना स्पर्धात्मक दरात वीज पुरवठा करणे शक्य होणार आहे. या योजनेतील हरित ऊर्जेच्या वापरामुळे पर्यावरण रक्षणाला हातभार लागणार असून नेट झिरो संकल्प पूर्तीसाठी मोठे योगदान होणार आहे. आतापर्यंत या योजनेअंतर्गत सर्व कृषी पंपांसाठी १६ हजार मेगावॅट वीजनिर्मिती क्षमता सौर ऊर्जेच्या आधारे करण्यासाठी कार्यादेश देण्यात आले असून मार्च २०२६ पर्यंत हे सर्व काम पूर्ण होणार आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे राज्यात ६५ हजार कोटींची खासगी गुंतवणूक होत असून ग्रामीण भागात ५० हजार रोजगार निर्माण होणार आहेत. या योजनेसाठी महावितरणचे विद्युत वितरण जाळे अधिक मजबूत करण्यात येत आहे, त्यामुळे कंपनीला तांत्रिक लाभ आहे तसेच वीज खरेदी खर्चातील बचतीमुळे कंपनीची आर्थिक बाजूही मजबूत होईल. एकंदरीत मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० हा गेम चेंजर प्रकल्प आहे.

**महावितरणसाठी अभिमानास्पद**

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेचे केंद्र सरकारने कौतुक केले असून अन्य राज्यांना त्यानुसार अंमलबजावणी करण्याची सूचना केली आहे. मा.पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारचे या योजनेत कुसुम सी योजनेच्या माध्यमातून महत्त्वाचे योगदान आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकारसाठी अत्यंत महत्त्वाच्या या योजनेच्या अंमलबजावणीत महावितरणला महत्त्वाची भूमिका मिळाली आहे, याचा मला अभिमान वाटतो.

शेतकऱ्यांचे भले करण्यासोबतच महावितरणचेही भाग्य उजळणारी ही योजना आहे. त्यामुळे या योजनेच्या अंमलबजावणीत महावितरणच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहयोग देणे अपेक्षित आहे. आतापर्यंत सर्वांनी चांगले काम केले आहे. नव्या वर्षात आता आणखी निर्धाराने काम करू. योजनेच्या अंमलबजावणीतील अडचणी सक्रियतेने सोडवू. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० साठी २०२५ हे वर्ष अत्यंत महत्त्वाचे आहे. मार्च २०२४ मध्ये लेटर ऑफ अॅवॉर्ड दिलेले ९१५५ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प सप्टेंबर २०२५ पर्यंत कार्यरत होतील व त्यामुळे सुमारे ७५ टक्के कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठा सुरू होईल. या वर्षात परिवर्तनाचा संकल्प पूर्ण करू.

◇◇◇



# नूतन मा. राज्यमंत्री यांचे स्वागत

**मा. श्रीमती मेघना बोर्डीकर**

राज्यमंत्री, महाराष्ट्र शासन

खाते–सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, ऊर्जा, महिला व बालविकास, पाणी पुरवठा व स्वच्छता, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)

विधानसभा मतदारसंघ – जिंतूर जि. परभणी



## कोरेगावमूळ उपकेंद्राला 'आयएसओ' मानांकन

### पुणे परिमंडलातील सातवे उपकेंद्र



'आयएसओ'चे मानांकन प्राप्त कोरेगावमूळ उपकेंद्रात पाहणी करताना मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार, 'आयएसओ'चे श्री. मंदार पत्की, अधीक्षक अभियंता श्री. युवराज जरग, कार्यकारी अभियंता श्री. माणिक राठोड समवेत अधिकारी-कर्मचारी.

**पुणे परिमंडलातील** कोरेगावमूळ ३३/२२ केव्ही उपकेंद्राने 'आयएसओ ९००१:२०१५'चे मानांकन मिळविले आहे. आतापर्यंत पुणे परिमंडलातील सात विद्युत उपकेंद्रे 'आयएसओ' मानांकीत आहेत.

पुणे ग्रामीण मंडलातील मुळशी विभागाच्या उरळीकांचन उपविभागातील कोरेगावमूळ ३३/२२ केव्ही उपकेंद्राने 'आयएसओ' मानांकनाचा प्रथम मान मिळविला आहे. या उपकेंद्राला मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार व परीक्षक श्री. ओंकार पत्की यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी अधीक्षक अभियंता श्री. युवराज जरग, मुळशीचे कार्यकारी अभियंता श्री. माणिक राठोड, सल्लागार श्री. यशवंत पत्की यांची उपस्थिती होती.

'आयएसओ'चे मानांकन मिळविण्यासाठी मुळशीचे कार्यकारी अभियंता श्री.माणिक राठोड, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्रीमती स्नेहलता हंचाटे, उपकार्यकारी अभियंता श्री. महेश धाडवे, सहाय्यक अभियंता श्री. रमेश वायकर, प्रधान यंत्रचालक श्री. रमाकांत सानप, यंत्रचालक श्रीमती अश्विनी चौगुले, श्री.सुभाष शेलार यांनी परिश्रम घेतले.

ग्राहकांना सुरळीत व दर्जेदार वीजपुरवठ्याची सेवा देण्यासाठी महावितरणचे उपकेंद्र व स्विचिंग स्टेशन्स अतिशय महत्त्वाचे आहेत. या उपकेंद्रांच्या आधुनिकीकरणासोबतच त्याची योग्य निगा, दर्जा व गुणवत्तेनुसार ठेवण्याचे निर्देश मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांनी दिले. त्यानुसार परिमंडलातील आतापर्यंत सात उपकेंद्रांनी 'आयएसओ'च्या मानांकन मिळवले आहे.

## माळीवाडा, वाळूज उपकेंद्रात नवीन रोहित्र कार्यान्वित

### २६ हजार ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठा



माळीवाडा उपकेंद्रातील अतिरिक्त रोहित्र कार्यान्वयन प्रसंगी मुख्य अभियंता श्री.पवनकुमार कछोट यांच्यासह अधिकारी व कर्मचारी.

**छत्रपती संभाजीनगर** परिमंडलातील ३३ केव्ही माळीवाडा उपकेंद्रात ५ एमव्हीए क्षमतेचे अतिरिक्त रोहित्र बसविण्यात आले आहे. वाळूज महानगर उपकेंद्रातील रोहित्राची १० एमव्हीए क्षमतावाढ करण्यात आली आहे. त्यामुळे या उपकेंद्र परिसरातील १६ गावातील २६ हजार ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठ्याची सोय झाली आहे.

वाढती ग्राहक संख्या व विजेची मागणी पूर्ण करण्यासाठी सहव्यवस्थापकीय संचालक श्री. राहुल गुप्ता, मुख्य अभियंता श्री.पवनकुमार कछोट यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी आकस्मिक निधीतून माळीवाडा उपकेंद्रात ५ एमव्हीए क्षमतेचे अतिरिक्त रोहित्र तर नवीन सेवा जोडणी योजनेतून वाळूज महानगर उपकेंद्रातील रोहित्राची १० एमव्हीए क्षमतावाढ करण्यात आली. आता दोन्ही उपकेंद्रांतील एकूण क्षमता प्रत्येकी १५ एमव्हीए झाली आहे. ७ हजार कृषी ग्राहक व १९ हजार औद्योगिक ग्राहकांना याचा लाभ होणार आहे.

मुख्य अभियंता श्री. पवनकुमार कछोट यांच्या हस्ते उपकेंद्र रोहित्र कार्यान्वित करण्यात आले. यावेळी अधीक्षक अभियंता श्री.संदीप दरवडे, कार्यकारी अभियंता सर्वश्री संदीप कलंत्री, सिद्धार्थ नायडू, उपकार्यकारी अभियंता सर्वश्री प्रवीण पवार, प्रदीप लटपटे, सहायक अभियंता सर्वश्री मोहंमद हकीम, गोविंद दुसंगे, कंत्राटदार सर्वश्री हरिशीव मगर, वीरेंद्र मंगलगे यांच्यासह यंत्रचालक, तंत्रज्ञ उपस्थित होते.

# हरित ऊर्जेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शेतकरी दुसरी हरित क्रांती घडवतील

## – मा.मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस

## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत दोन सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पांचे लोकार्पण



मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत उंबर्डा जि.वाशिम, नारंगवाडी जि.धाराशिव या दोन सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पांचे लोकार्पण मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले. यावेळी मुख्य सचिव श्रीमती सुजाता सौनिक, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री.लोकेश चंद्र व मंत्रालयातील उच्चपदस्थ अधिकारी.

**राज्यभरात** मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या अंतर्गत ठिकठिकाणी १६ हजार मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प उभारण्यात येत आहेत. यामुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होणार असून भविष्यात या हरित ऊर्जेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शेतकरी दुसरी हरित क्रांती घडवतील, असा विश्वास मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत वाशिम जिल्ह्यातील उंबर्डा आणि धाराशिव जिल्ह्यातील नारंगवाडी येथील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पांचे लोकार्पण मा.मुख्यमंत्र्यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले.

यावेळी मुख्य सचिव श्रीमती सुजाता सौनिक, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री.लोकेश चंद्र, अपर मुख्य सचिव (जलसंपदा) श्री. दीपक कपूर, अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) श्रीमती वल्सा नायर – सिंह, अपर मुख्य सचिव (वित्त) श्री. ओ.पी. गुप्ता, अपर मुख्य सचिव (सहकार) श्री. राजगोपाल देवरा, मा. मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव श्रीमती अश्विनी भिडे, मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी आणि महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजीवकुमार यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे शेतकऱ्यांना दिवसा शाश्वत वीज उपलब्ध होईल. राज्यातील शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी १६ हजार मेगावॅट इतकी वीज देतो. पंपांना वीजपुरवठा करणारे सर्व कृषी फीडर सौर ऊर्जेवर चालविण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत काम सुरू केले आहे. टप्प्याटप्प्याने हे सर्व फीडर सौर ऊर्जेवर चालविण्यात येतील.

या कार्यक्रमाला उंबर्डा आणि नारंगवाडी गावातील शेतकरी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते. वाशिम जिल्ह्यातील कारंजा (लाड) तालुक्यातील उंबर्डा येथील सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पाची क्षमता ४ मेगावॅट आहे. या प्रकल्पामुळे १७११ शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा होणार आहे. धाराशिव जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील नारंगवाडी येथील प्रकल्प २ मेगावॅट क्षमतेचा आहे. एकूण ८४५ शेतकरी या प्रकल्पाचे लाभार्थी आहेत. वाशिम आणि धाराशिव जिल्ह्यातील एक – एक सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प यापूर्वीच सुरू झाले आहेत.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेतील पहिल्या पाच प्रकल्पांचे लोकार्पण मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑक्टोबर महिन्यात करण्यात आले होते. या योजनेअंतर्गत राज्यात नोव्हेंबर अखेर १५,७०८ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी कार्यादेश देण्यात आले आहेत. त्यापैकी ६६९ मेगावॅट क्षमता कार्यान्वित झाली आहे. त्यामधून १,३०,४८६ शेतकऱ्यांना दिवसा आठ तास थ्री फेज वीजपुरवठा सुरू करण्यात आला आहे.

राज्यात शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी दिवसा आणि रात्री अशा दोन पाळ्यांमध्ये वीजपुरवठा केला जातो. शेतकऱ्यांना केवळ दिवसा भरवशाचा वीजपुरवठा करावा, अशी अनेक दशकांची मागणी आहे. त्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही योजना मा.श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते एप्रिल २०२३ मध्ये सुरू करण्यात आली. या योजनेत राज्यभरात विविध ठिकाणी सौर ऊर्जा प्रकल्प उभारून विकेंद्रीत स्वरूपात कृषी फीडर्सना विजेचा पुरवठा करण्यात येईल. त्यातून शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा होईल तसेच या योजनेत किफायतशीर दरात वीज मिळाल्यामुळे राज्य सरकारचे अनुदान आणि उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा कमी होईल.



नारंगवाडी सौरप्रकल्प

# नागपूर प्रादेशिक विभागाची आढावा बैठक



▸▸ नागपूर प्रादेशिक विभागातील आढावा बैठकप्रसंगी संचालक (संचालन तथा मानव संसाधन) श्री. अरविंद भादिकर, संचालक (प्रकल्प) श्री. प्रसाद रेशमे.

**लघुदाब वितरण** हानी व अकृषी वीज विक्रीचे लक्ष्य साध्य करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत. या कामी दिरंगाई झाल्यास कठोर कारवाई करण्याचा इशारा संचालक (संचालन तथा मानव संसाधन) श्री. अरविंद भादिकर यांनी दिला. तर मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेतील छाननीसाठी प्रलंबित असलेल्या अर्जाचा त्वरित निपटारा करावा तसेच पंतप्रधान सूर्यघर मोफत वीज योजनेत एजन्सीची निवड केली नसलेल्या अर्जदारांची यादी तयार करण्याचे निर्देश संचालक (प्रकल्प) श्री. प्रसाद रेशमे यांनी दिले. नागपूर प्रादेशिक विभागात आयोजित आढावा बैठकप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी प्रादेशिक संचालक श्री. परेश भागवत, कार्यकारी संचालक सर्वश्री धनंजय औंढेकर (पायाभूत आराखडा), दत्तात्रय पडळकर (वितरण), मुख्य अभियंते सर्वश्री दिलीप दोडके, ज्ञानेश कुलकर्णी, हरीश गजबे, मंदार अत्रे, प्रादेशिक विभागातील अधीक्षक अभियंते व विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

प्रत्येक तिमाहीत लघुदाब अकृषी वीज विक्रीतील वाढ ही लघुदाब वीजपुरवठा वाढीशी सुसंगत असल्याची खात्री करा. वीजहानी अधिक असलेल्या वाहिन्यांवर वीजचोरीविरोधात कठोर मोहीम राबवा. क्षेत्रीय कार्यालयांना नियमित भेटी द्याव्यात, असे निर्देश श्री.भादिकर यांनी बैठकीत दिले. कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित ग्राहकांच्या थकबाकी वसूलीसाठी विशेष प्रयत्न करा. वीजपुरवठा खंडित असलेल्या ग्राहकांकडील पुनर्जोडणी, नवीन वीजजोडणी याबाबत मुख्यालयाकडून वेळोवेळी आढावा घेतला जाईल, असे श्री.भादिकर यांनी सांगितले.

कुसुम-ब योजनेंतर्गत सर्व देय प्रकरणे त्वरित सोडवावेत, सौर ग्राम योजनेतील गावांच्या १०० टक्के सौर ऊर्जीकरणासाठी जोमाने प्रयत्न होणे आवश्यक असल्याचे निर्देश श्री. रेशमे यांनी दिले. ◈◈◈

# छत्रपती संभाजीनगर परिमंडलात ग्राहक दिन साजरा

**छत्रपती संभाजीनगर** परिमंडल कार्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यात आला. मुख्य अभियंता श्री.पवनकुमार कछोट यांच्या हस्ते वाळूज एमआयडीसीतील श्रीमती अनुश्री आढाव व श्री. गीतेश साबणे या उच्चदाब औद्योगिक ग्राहकांचा प्रातिनिधीक सत्कार करण्यात आला. यावेळी ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाचे सदस्य श्री.श्रीकांत बाविस्कर, सदस्य सचिव तथा कार्यकारी अभियंता श्री.मकरंद कुलकर्णी, कार्यकारी अभियंता (प्रशासन) श्री.सतीश खाकसे, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. विश्वास पाटील यांची उपस्थिती होती.

यावेळी मुख्य अभियंता श्री.कछोट म्हणाले की, औद्योगिक ग्राहकांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रत्येक मंडल कार्यालयात विशेष 'स्वागत कक्ष' सुरु करण्यात आलेले आहेत. या कक्षामध्ये ग्राहकांनी समस्या मांडाव्यात. त्या सोडवण्यासाठी पारदर्शकपणे प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी दिली. ◈◈◈

# अकोला जिल्ह्यातील पांगरा, माना सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित



▸▸ माना सौर प्रकल्प कार्यान्वयन प्रसंगी मुख्य अभियंता (प्र.) श्री. अजय शिंदे, अधीक्षक अभियंता(प्र)श्री.अजितपालसिंह दिनोरे, कार्यकारी अभियंते सर्वश्री गोरक्षणाथ सपकाळे, शशांक पोंक्षे व अधिकारी-कर्मचारी.

**मुख्यमंत्री** सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत अकोला जिल्ह्यातील दुसरा सौर प्रकल्प पातूर तालुक्यातील पांगरा (०३ मेगावॅट) तर तिसरा सौर प्रकल्प मुर्तीजापूर तालुक्यातील माना (२ मेगावॅट) येथे कार्यान्वित करण्यात आला आहे. या दोन प्रकल्पामुळे जिल्ह्यातील १०२४ शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा उपलब्ध होणार आहे.

पांगरा सौर प्रकल्प ३३ केव्ही चान्नी उपकेंद्राशी जोडण्यात आला आहे. चान्नी उपकेंद्रातून निघणाऱ्या ११ केव्ही मळसूर आणि ११ केव्ही पिंपळखुटा या कृषी वीज वाहिनीवरील सावनी,मळसूर,गावनगाव,पहाडसिंगी, पांगरडाटी, आडगाव, वहाडा या गावातील गावातील ५४० शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा मिळणार आहे. ३३ केव्ही माना उपकेंद्राव्दारे माना परिसरातील ४८४ शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळणार आहे. ◈◈◈

# मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठ्यासोबत मोफत वीज योजनेची भरपाई

## मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन



**शेतकऱ्यांना सिंचनासाठी** मोफत वीज देण्याची योजना पुढील पाच वर्षे चालू ठेवण्याचा सरकारचा निर्धार आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेमुळे शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीजपुरवठा करण्यासोबतच त्यांना मोफत वीज देण्यासाठी होणाऱ्या खर्चाची भरपाई होणार आहे, अशी माहिती मा. मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी हिवाळी अधिवेशनादरम्यान विधानसभेत दिली. अत्यंत कमी काळात योजनेची अंमलबजावणी केल्याबद्दल त्यांनी ऊर्जा विभागाचे अभिनंदन केले.

मा.मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना दिवसा अखंडित थ्री फेज वीजपुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेचे काम सुरू केले आहे. त्या अंतर्गत एमएसईबी सोलर ॲग्रो पॉवर लिमिटेड ही देशातील पहिली शेतकऱ्यांना वीज देणारी कंपनी स्थापन केली. कंपनीच्या अंतर्गत १६ हजार मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पांचे काम सुरू केले आहे. यात ८४२८ कृषी वाहिन्या (फीडर्स) सौर ऊर्जेवर चालवणार आहोत. आतापर्यंत ६६९ मेगावॅट एवढी क्षमता कार्यान्वित झाली आहे. त्यातून १, ३०,४८६ कृषी ग्राहकांना दिवसा वीजपुरवठा सुरू केला आहे. २०२६ पर्यंत १६ हजार मेगावॅटची कामे पूर्ण करून सर्व शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीजपुरवठा करण्याचा प्रयत्न आहे.

त्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांकडून आगामी पाच वर्षात विजेचे बिल घ्यायचे नाही, हा निर्धार कायम आहे. शेतकऱ्यांना मोफत वीज देण्यासाठी अर्थसंकल्पावर सध्या १५ हजार कोटी रुपयांचा भार पडतो तेवढेच पैसे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे वाचणार आहेत. सध्या आठ रुपये प्रतियुनिट दराने मिळणारी वीज शेतकऱ्यांना दीड रुपये प्रतियुनिट दराने उपलब्ध केली जाते. आता हे बिलही सरकार भरते. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत तीन रुपये प्रतियुनिट दराने वीज मिळणार असल्याने वीज खरेदीत दहा हजार कोटी रुपये वाचतील. तसेच अनुदान आणि क्रॉस सबसिडीच्या पाच हजार कोटी रुपयांची बचत होईल. परिणामी २०२६ पर्यंत शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यासोबतच त्यांच्या मोफत वीज योजनेचे पैसेही मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे वाचणार आहेत.

मा. मुख्यमंत्री म्हणाले की, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या अंमलबजावणीबद्दल आपण ऊर्जा विभागाचे अभिनंदन करतो. खूप कमी काळामध्ये योजनेसाठी जमीन शोधणे, त्यावर सौर ऊर्जा प्रकल्प विकसित करण्यासाठी निविदा काढणे, विकसक निवडणे हे काम पारदर्शीपणे करण्यात आले. कमीत कमी दरात वीज उपलब्ध करण्यासाठी रिव्हर्स बिडिंग पद्धतीने काम करण्यात आले.

त्यांनी सांगितले की, मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेचे गतीने काम चालू आहे. त्यासाठी ९ लाख कृषी पंप उपलब्ध आहेत. त्यामुळे पेड पेंडिंग आता संपुष्टात येईल. आतापर्यंत २,३६,१८६ सौर कृषी पंप आस्थापित केले आहेत. जेव्हापासून सौर पंप योजना सुरू झाल्या त्या काळात जेवढे सौर पंप लावले त्यापेक्षा अधिक सौर पंप गेल्या एका वर्षात आस्थापित केले आहेत. या कामगिरीबद्दल विभागाचे अभिनंदन.

आपल्या सरकारने ऊर्जा क्षेत्रामध्ये खूप मोठ्या प्रमाणात योजना सुरू केल्या आहेत. राज्याची आतापर्यंतची स्थापित वीजनिर्मिती क्षमता ४४ हजार मेगावॅटची आहे. आता ५४ हजार मेगावॅटचे वीज खरेदीचे करार झाले आहेत. सध्या वीजपुरवठ्यामध्ये १६ टक्के वीज अपारंपरिक तर ८४ टक्के पारंपरिक आहे. आपण हाती घेतलेल्या प्रकल्पांमुळे २०३० पर्यंत राज्यात ५२ टक्के वीजपुरवठा अपारंपरिक विजेचा म्हणजेच हरित ऊर्जेचा असेल तर ४८ टक्के वीजपुरवठा पारंपरिक असेल, अशी माहिती त्यांनी दिली.



◈◈◈

# सांगली जिल्ह्यातील पहिला सौरप्रकल्प बसरगी येथे कार्यान्वित

**शेतकऱ्यांना** सिंचनासाठी दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० राबविण्यात येत आहे. या योजनेतून सांगली जिल्ह्यातील पहिला सौरऊर्जा प्रकल्प बसरगी (ता.जत) येथे कार्यान्वित करण्यात आला आहे. या ४ मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पामुळे बसरगी, सिंदुर व गुगवाड या गावांतील ११०० शेतकऱ्यांना शेतीसाठी दिवसा वीजपुरवठा मिळणार आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील दुसरा सौर ऊर्जा प्रकल्प किणी (ता. हातकणंगले) येथे कार्यान्वित झाला आहे. या २ मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पामुळे ११ केव्ही भादोले व घुणकी या कृषी वाहिन्यांवरील वाठार, किणी व घुणकी या गावांतील १२१६ शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा मिळणार आहे. ◈◈◈



▸▸ बसरगी सौरप्रकल्प.

## नूतन सहव्यवस्थापकीय संचालकांचे स्वागत!



**श्री. दिलीप ज्ञानदेव जगदाळे (भाप्रसे )**
सहव्यवस्थापकीय संचालक
कोकण प्रादेशिक विभाग, कल्याण

## नूतन मुख्य अभियंता यांचे अभिनंदन !



**श्री. धर्मराज पंढरीनाथ पेठकर**
मुख्य अभियंता,
बारामती परिमंडल



**श्री. पंकज सुभाष तगलपल्लेवार**
मुख्य अभियंता
विशेष प्रकल्प विभाग
सांघिक कार्यालय, मुंबई

## मुख्य अभियंता : बदली व पदस्थापना

| अधिकारी यांचे नाव | यापूर्वीचे ठिकाण | पदस्थापना ठिकाण |
|---|---|---|
| अनिल गुरूदत्त डोये | नांदेड परिमंडल | रत्नागिरी परिमंडल |
| दिपक अनंत कुमठेकर | नाशिक परिमंडल | सांघिक कार्यालय, मुंबई |

## नंदनवन उपविभागात रक्तदान शिबिर

**नागपूरच्या** महाल विभागातील नंदनवन उपविभागात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ४५ कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले. अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. धीरज बारापात्रे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी सहाय्यक अभियंता श्री. योगेश इटनकर यांच्यासह अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. साईनाथ ब्लड बँकेचे सहकार्य लाभले. ◇◇◇

**सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!**

## जळगाव - नाशिक परिमंडलाच्या क्रीडा संघ निवड चाचणी स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद



▸▸ धुळे जिल्हा क्रीडा सुकंलावर जळगाव व नाशिक परिमंडलाच्या संयुक्त संघ निवडीसाठी खेळाडू कर्मचारी चाचणी क्रीडा स्पर्धा उद्घाटनप्रसंगी मुख्य अभियंता श्री.आय. ए. मुलाणी यांच्यासह अधिकारी-कर्मचारी.

**राज्यस्तरीय** क्रीडा स्पर्धा, बारामती - २०२५ करिता जळगाव व नाशिक परिमंडलाच्या संयुक्त संघ निवडीसाठी खेळाडू कर्मचाऱ्यांची चाचणी क्रीडा स्पर्धा धुळे येथील जिल्हा क्रीडा संकुलाच्या मैदानावर पार पडली. यात २०० हून अधिक कर्मचारी खेळाडूंनी सहभाग नोंदविला. मुख्य अभियंता श्री.आय. ए. मुलाणी यांच्या हस्ते निवड चाचणी स्पर्धेचे उद्घाटन झाले. यावेळी अधीक्षक अभियंते सर्वश्री नीरज वैरागडे (धुळे), अनिल महाजन (जळगाव), सहायक महाव्यवस्थापक (मासं) श्री.अशोक केदारे यांच्यासह अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. ◇◇◇

## सांघिक कार्यालय - भांडूप नागरी परिमंडलाच्या क्रीडा संघाची निवड चाचणी उत्साहात



अलिबाग येथील राष्ट्रीय केमिकल अँड फर्टिलाइजर कंपनीच्या मैदानावर सांघिक कार्यालय व भांडूप परिमंडलाच्या संयुक्त संघ निवडीसाठी खेळाडू कर्मचारी चाचणी क्रीडा स्पर्धा उद्घाटनप्रसंगी मुख्य अभियंता श्री. सुनील काकडे यांच्यासह अधिकारी-कर्मचारी.

**बारामती** येथे होणाऱ्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी सांघिक कार्यालय व भांडूप परिमंडलाच्या संयुक्त संघाची निवड चाचणी नुकतीच पार पडली. अलिबाग येथील राष्ट्रीय केमिकल अँड फर्टिलाइजर कंपनीच्या मैदानावर चाचणी क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. यात २५० हून अधिक कर्मचारी खेळाडूंनी सहभाग नोंदविला. मुख्य अभियंता श्री. सुनील काकडे यांच्या हस्ते निवड चाचणी स्पर्धेचे उद्घाटन झाले. यावेळी अधीक्षक अभियंते सर्वश्री युवराज मेश्राम (ठाणे), राजाराम माने (पेण), आरसीएफ कंपनीचे श्री. पाटील, कार्यकारी अभियंता सर्वश्री श्रीनिवास चटलावर (प्रशासन), श्री. प्रदीप दालु (रोहा), श्री. रविकिरण पाटील (पेण), श्री. शैलेश कुमार रमेशचंद्र (अलिबाग),सहायक महाव्यवस्थापक श्रीमती नमिता गझदर (मासं), उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. महेंद्र बागुल (भांडूप) यांच्यासह अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते. ◇◇◇

# ग्राहक सेवेच्या गुणवत्तेत सुधारणा करून सातत्य राखा

## संचालक (संचालन तथा मानव संसाधन) श्री. अरविंद भादिकर



**केंद्र शासनाच्या** 'इझ ऑफ लिव्हिंग' म्हणजेच राहणीमान सुलभता अभियानानुसार वीज ग्राहकांना राज्य विद्युत नियामक आयोगाने निश्चित केलेल्या मानकानुसार उत्तम सेवा देणे आणि त्या सेवेत सातत्य राखणे ही आपली जबाबदारी आहे, हे लक्षात घेऊन काम करा. वितरण हानी कमी करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करणे, ग्राहक सेवेमध्ये गुणात्मक सुधारणा करणे, ग्राहकाभिमूख विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करतांना परिमंडलात १००% वीजबिल वसुली करण्याचे निर्देश संचालक (संचालन तथा मानव संसाधन) श्री. अरविंद भादिकर यांनी दिले.

अमरावती परिमंडलातील विद्युत भवन येथे झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्य अभियंता श्री.ज्ञानेश कुलकर्णी, अधीक्षक अभियंते सर्वश्री दीपक देवहाते (अमरावती), प्रवीण दरोली (यवतमाळ), श्रीमती दिपाली माडेलवार (पायाभूत आराखडा) यांच्यासह अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी मंडलनिहाय आढावा घेतांना श्री.भादिकर म्हणाले की, वितरण हानी कमी करण्यासाठी ठरवून दिलेल्या कृती आराखड्यानुसार काम होणे आवश्यक आहे. त्यामध्ये प्रामुख्याने ग्राहकांना वापरानुसार अचूक वीजबिल देणे, ग्राहकांचे नादुरुस्त मीटर बदलणे, वीज चोरीला आळा घालण्यासाठी नियमित ग्राहक मीटर तपासणी मोहिम राबविणे, वीज चोरी असलेल्या क्षेत्रात एरियल बंच केबलचा वापर करणे, ग्राहकांना तत्काळ वीज जोडणी देणे, ग्राहकांच्या खंडित वीजपुरवठा, देयक दुरुस्ती इत्यादी तक्रारींचे त्वरित निवारण करणे आदींचा समावेश आहे.

तथापि, विजेची गळती कमी करण्याच्या दृष्टीने वीज चोरीला आळा घालण्यासाठी नियमित तपासणी मोहीम राबवणे,वीज चोरी पकडणे व गुन्हा दाखल करणे, अत्यल्प तसेच सरासरी वीज बिल असलेल्या ग्राहकांची तपासणी करणे, याबाबत विशेष प्रयत्न झाले नसल्याने मा. संचालकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित ग्राहकांसाठी अभय योजना जाहीर केलेली असून त्यामध्ये संपूर्ण व्याज व विलंब आकाराची माफी असताना ग्राहकांचा समाधानकारक प्रतिसाद नसल्याने सर्व थकबाकीदार कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित ग्राहकांची प्राधान्याने तपासणी करणे, अनाधिकृत वीज पुरवठा आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करणे, जर अन्य ग्राहकाच्या नावाने त्या जागेवर नवीन वीज जोडणी दिलेली आढळल्यास जुनी थकबाकी त्या नवीन ग्राहकांकडे वळती करणे, तसेच विभागवार पथके तयार करून वीज चोरी रोखण्यात यावी. कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित ग्राहकाच्या जागेवर विजेचा वापर होत नसल्यास अथवा संबंधित इमारत ढासळली असल्यास त्या जागेवर वीज बिलाची थकबाकी असेल तर त्या जागेवर महावितरणची वीज बिल थकबाकी भरणे जुन्या किंवा नवीन ग्राहकावर बंधनकारक असल्याचे स्पष्ट सूचनाफलक लावण्यात यावेत, असे निर्देश त्यांनी दिले.

महावितरणने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयामुळे प्रत्येक वीज वाहिनीला लावण्यात आलेल्या अत्याधुनिक मीटरमुळे २४/७ माहिती उपलब्ध होत आहे. त्यानुसार विशिष्ट कालावधीमध्ये विशिष्ट वाहिनीचा किंवा भागाचा वीज पुरवठा किती वेळा खंडित झाला, याची माहिती थेट वरिष्ठ कार्यालयाला उपलब्ध होणार असल्याने वीज खंडित होण्याच्या घटना यापुढे कमी होऊन याचा फायदा सुरळीत वीज पुरवठ्यासाठी होणार आहे.

तसेच केंद्र शासनाच्या 'इज ऑफ लिविंग' अभियानानुसार सर्व नवीन वीज जोडण्या विहित मुदतीत देण्याचे निर्देश त्यांनी दिले, मुदतीनंतर वीज जोडणी दिल्याचे आढळल्यास लागू असलेला दंड यापुढे दोषी कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात करण्यात येईल, असे श्री.भादिकर यांनी स्पष्ट केले. पायाभूत सुधारणांशी संबंधित प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना, मागेल त्याला सौर कृषी पंप योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, सौर ग्राम योजनांचा सविस्तर आढावा घेऊन उद्दिष्टानुसार काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले. ◇◇◇

# पुणे परिमंडल कार्यालयात 'ज्ञानऊर्जा' वाचनालयाचे उद्घाटन



▸▸ पुणे परिमंडलात अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी सुरु केलेल्या 'ज्ञानऊर्जा' वाचनालयाचे उद्घाटन करताना मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार, समवेत अधिकारी-कर्मचारी.

**कर्मचाऱ्यांमध्ये** वाचन संस्कृती रूजावी या हेतूने पुणे परिमंडलाच्या प्रशासकीय इमारतीमध्ये 'ज्ञानऊर्जा' वाचनालय सुरू करण्यात आले. या वाचनालयाचे उद्घाटन मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांच्या हस्ते झाले.

वाचनालयात वीजक्षेत्रासह सामाजिक, ऐतिहासिक तसेच विविध क्षेत्रातील नामवंत लेखकांची पुस्तके, कथासंग्रह, कादंबऱ्या उपलब्ध आहेत. तसेच वाचनालयाशेजारी विरंगुळा कक्ष असून त्यात कॅरम व बुद्धिबळ खेळण्यासाठी उपलब्ध आहे. या उपक्रमांचे उद्घाटन मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी अधीक्षक अभियंता सर्वश्री अरविंद बुलबुले, सिंहाजीराव गायकवाड, युवराज जरग, संजीव नेहेते, सहायक महाव्यवस्थापक श्रीमती माधुरी राऊत (वित्त) व ज्ञानदा निलेकर (मानव संसाधन), उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भूपेंद्र वाघमारे, कार्यकारी अभियंता सर्वश्री धनराज बिक्कड, वीरेंद्र मुळे, रवींद्र बुंदेले, माणिक राठोड, चंद्रकांत दिघे, सहायक संचालक श्री. गजानन खेडेकर आदींची उपस्थिती होती. ◇◇◇

# शून्य वीज अपघात मोहीम राबवा - श्री. दत्तात्रय बनसोडे

## सुरक्षा साधनांचा वापर न केल्यास होणार कारवाई

## बाह्यस्रोत कर्मचाऱ्यांना सुरक्षा किटचे वाटप



▸▸ अमरावती येथील अपघात व सुरक्षाविषयक कार्यशाळेप्रसंगी मुख्य महाव्यवस्थापक (प्रशिक्षण व सुरक्षा) श्री. दत्तात्रय बनसोडे, मुख्य अभियंता श्री. ज्ञानेश कुलकर्णी, अधीक्षक अभियंता श्री. दीपक देवहाते यांच्यासह अधिकारी व कर्मचारी.

**महावितरणचा** तांत्रिक कर्मचारी सुरक्षा साधनांच्या वापराबाबत प्रशिक्षित असूनही तो अपघाताला बळी पडतो, हे अत्यंत दुर्दैवी आहे. अतिआत्मविश्वास बाळगणे, सुरक्षा साधनांचा वापर न करणे या कारणांमुळे अपघाताच्या घटना घडत असल्याचे निदर्शनास आले आहे. अपघातात एखाद्या कर्मचाऱ्याचा मृत्यू ओढवतो मात्र त्या अपघाताची झळ कुटुंबाला कायमस्वरूपी सोसावी लागते. त्यामुळे शून्य अपघात मोहीम राबवा, असे प्रतिपादन मुख्य महाव्यवस्थापक (प्रशिक्षण व सुरक्षा) श्री. दत्तात्रय बनसोडे यांनी केले.

अमरावती प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रात तंत्रज्ञ आणि बाह्यस्रोत कर्मचारी यांच्यासाठी आयोजित अपघात व सुरक्षा कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी मुख्य अभियंता श्री.ज्ञानेश कुलकर्णी, अधीक्षक अभियंता श्री.दीपक देवहाते, कार्यकारी अभियंता सर्वश्री राजकुमार पाटील व अनिरुद्ध आलेगावकर उपस्थित होते.

यावेळी श्री.बनसोडे म्हणाले की, विद्युत क्षेत्रात काम करताना सुरक्षा नियमाचे पालन व्हायलाच पाहिजे. आयुष्यापेक्षा मौल्यवान काहीच नसते, त्यामुळे तांत्रिक कर्मचाऱ्यांनी ''तीन रॉड जिंदगी के (अर्थिंग रॉड)'' कायम सोबत ठेवून त्याचा सदैव वापर करावा. एकूण विद्युत अपघातापैकी ६० टक्के अपघात हे लघुदाब वाहिन्यांवर होतात. ते टाळण्यासाठी विद्युत वाहिन्यांमध्ये स्पेसर्स लावावे, जेणेकरून एखादी वाहिनी तुटली तरी ती जमिनीवर पडणार नाही, विजेचा भार वाढला तरी शॉर्टसर्किट होणार नाही, झुकलेले खांब सरळ करावेत, वीज वाहिन्यांना आवश्यक त्या ठिकाणी गार्डिंग लावावे.

तसेच प्रशिक्षण विभागाच्या पुढाकाराने सांघिक कार्यालयाने तांत्रिक कर्मचाऱ्यांना लागणाऱ्या सुरक्षा साधनांची यादी, वितरित साहित्याची नोंद, वार्षिक आढावा इ. संदर्भात निर्गमित परिपत्रकाची माहिती दिली. या परिपत्रकानुसार क्षेत्रीय कार्यालयांनी योग्य ती कार्यवाही करून नियमित आढावा घेण्याच्या सूचना दिल्या.

तांत्रिक कामांची आकस्मिक पाहणी करण्यात येणार असून जे कर्मचारी सुरक्षा साधनांचा वापर करणार नाहीत, त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्य अभियंता श्री. ज्ञानेश कुलकर्णी म्हणाले की, प्रशिक्षित तांत्रिक कर्मचारी ही कंपनीची संपत्ती आहे. विद्युत क्षेत्र हे २४ तास सेवेचे व चुकीला माफी नसलेले क्षेत्र आहे. असे असतानाही कर्मचारी सुरक्षा साधनाचा वापर करीत नाहीत, हे दुर्दैवी आहे. विद्युत अपघात टाळण्यासाठी नेहमी सुरक्षा साधनांचा वापर करावा व योग्य ती खबरदारी घ्यावी. शिवाय वाहन चालवताना प्रत्येक कर्मचाऱ्यांने हेल्मेट वापरावे.

यावेळी स्वाभिमान वीज तांत्रिक नागरी सेवा सहकारी संस्थेमार्फत बाह्यस्रोत कर्मचाऱ्यांना सुरक्षाविषयक कार्यशाळेत सुरक्षा साधनांच्या किटचे वाटप करण्यात आले. प्रास्ताविक उपकार्यकारी अभियंता श्री.राजेश पाटील, सूत्रसंचालन श्री. राजीक तर आभारप्रदर्शन श्री. राजेश बिजवे यांनी केले.

◇◇◇



Printed & Published by Shri. Bharat Pawar of Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd. Printed at Jyotirling Enterprises, 315 - B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N. M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011.
& Published at Hongkong Bank Bldg, M. G. Road, Fort, Mumbai - 400 001. Tel. : 2261 9100
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.

संपादक : श्री. भारत पवार • उपसंपादक : श्री. किशोर खोबरे
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महावितरण विद्युत वार्ता
प्रकाशगड, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०० ०५१.
(खाजगी वितरणासाठी)